RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ७९

दि.१६ जुलै २०२६, वार : गुरूवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# शेतकऱ्यांची ४८ हजार कोटी रुपयांची वीज बिल थकबाकी माफ करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## राज्यातील शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सन्मान





**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य शासनाने साडेसात हॉर्स पॉवरपर्यंत कृषीपंपांचे वीजबील माफ केले आहे. परंतु अनेक शेतकऱ्यांच्या नावावर पूर्वीची थकबाकी कायम असल्याने त्यांना नवीन वीज जोडणी घेण्यास अडचणी येत आहेत. यासाठी ४८ हजार कोटी रुपयांचे पूर्वीचे थकीत वीजबील माफ करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

राज्यातील शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती दिल्याबद्दल शेतकऱ्यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा तुलसीहार, विठ्ठल-मूर्ती आणि बैलगाडीची प्रतिकृती भेट देऊन यशवंतराव चव्हाण सेंटर येथे सन्मान करण्यात आला. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. यावेळी आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके, आमदार रवींद्र चव्हाण, प्रवीण दरेकर, रणधीर सावरकर, संजय कुटे, खासदार अनिल बोंडे तसेच राज्याच्या विविध भागांतून आलेले शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देणारी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत ५० हजार रुपयांचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर योजनेमध्ये ५० हजार रुपयांचा लाभ देण्याची मर्यादा काढून टाकण्यात आली असून या शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६-२७ मध्ये कर्जाची उचल करुन वेळेत परतफेड करण्याची अट सुद्धा रद्द करण्यात आली आहे.

### शाश्वत शेतीसाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक

राज्य शासन शाश्वत शेतीसाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहे. पीक कर्जमाफीसोबतच सिंचन प्रकल्प, जलसंचय, कोल्ड स्टोरेज, मूल्यवर्धन, प्रक्रिया उद्योग आणि बाजारपेठ जोडणी यासाठी राज्याने हजारो कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

पुढील काही वर्षांत या गुंतवणुकीचा प्रत्यक्ष परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर दिसेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. यासोबतच उच्च दर्जाची बियाणे, आधुनिक शेती तंत्रज्ञान, ड्रिप आणि स्प्रिंकलरसारख्या पाणी बचत पद्धती, तसेच डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे थेट बाजारपेठेशी जोडणी यासाठी स्वतंत्र योजनांमधून अनुदान दिले जात आहे. देशाची अन्नसुरक्षा आणि आर्थिक स्थैर्य टिकवण्यासाठी कृषी क्षेत्रात सतत गुंतवणूक करणे ही राज्य शासनाची प्राथमिकता आहे असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

### नव्या तंत्रज्ञानाचा गावपातळीवर प्रसार

राज्यातील कृषी विश्वविद्यालये, सहकारी संस्था आणि खासगी क्षेत्र यांच्या भागीदारीतून नव्या तंत्रज्ञानाचा गावपातळीवर प्रसार करून शेती अधिक उत्पादनक्षम आणि नफा देणारी करण्याचे ध्येय राज्य शासनाने ठेवले आहे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात किमान दुप्पट वाढ करण्यासाठी आगामी काळात आणखी काही महत्त्वाचे निर्णय घेतले जातील, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. पुढील पाच-दहा वर्षांत योग्य नियोजन आणि केंद्रराज्य सरकारच्या संयुक्त गुंतवणुकीतून शेती क्षेत्र स्वतःच्या पायावर उभे राहील असे नियोजन सुरू आहे. शेती क्षेत्रात केंद्र आणि राज्य सरकारकडून मिळून यावर्षी ९५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक विविध योजनांद्वारे करण्यात येत आहे.

### नैसर्गिक शेती, जीवामृत यासारख्या प्रयोगांवर भर

शेतीतील उत्पादन खर्च कमी करण्यासाठी इस्रायल फर्टिगेशन आणि पूर्ण ऑटोमेशन असलेले ठिबक सिंचन यासारख्या तंत्रज्ञानाचा आदर्श घेत 'एआय'चा वापर सुरू केला आहे. रासायनिक खतांचा वापर कमी करून जमिनीची सुपीकता टिकवण्यासाठी नैसर्गिक शेती, जीवामृत यासारख्या प्रयोगांवर भर देण्याचे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विकास विभागाच्या माध्यमातून देशी गाईंचे संवर्धन आणि नैसर्गिक शेतीचा प्रसार सुरू आहे. गोमूत्र, शेण, गूळ, हळद इत्यादींच्या मिश्रणातून तयार होणाऱ्या जीवामृतसारख्या उपायांनी कमी खर्चात उत्पादन वाढते आहे. अशा अनेक प्रयोगांतून उत्पादन क्षमता वाढवण्याचा प्रयत्न सुरू आहे. शेती क्षेत्रातही दीर्घकालीन बदल घडवण्याचा शासनाचा मानस आहे. महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्यासाठी नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून जलसाठा वाढविण्यात येत आहे.

सातारासांगली परिसरात दरवर्षी पूराचे पाणी वाहून जाते. वळण बंधाऱ्याच्या माध्यमातून हे पाणी मराठवाड्यात वळविण्याचा प्रयत्न आहे. आपण दुष्काळ पाहिला, परंतु पुढील पिढीला दुष्काळ पाहावा लागणार नाही, असा महाराष्ट्र घडवण्याचा संकल्प करूया असे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

यावेळी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, राज्य शासनाने शेतकरी हितासाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. अतिवृष्टीत शेतकऱ्यांचे पीक, घरे आणि जनावरे वाहून गेल्यावर आपत्कालीन तातडीने मदत केली आहे. पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेत ५६ लाखांहून अधिक शेतकरी लाभार्थी ठरले आहेत. सुरुवातीची ३६,५८५ कोटींची कर्जमुक्तीची तरतूद होती आता ती ४०,५८५ कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात आले आहे. डॉ. पंजाबराव देशमुख पीककर्ज योजना, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, पीएम किसान आणि नमो शेतकरी योजना यांतून शेतकऱ्यांना हजारो कोटींची मदत देण्यात येत आहे महिला शेतकरी सन्मान, एआय धोरण, कृषी समृद्धी आणि पाणंद रस्ता या योजनेसारखे अनेक शेतकरी हिताचे निर्णय राज्य शासनाने घेतले आहेत, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

## शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी निवडीबद्दल डॉ. अजय जाधव यांचा सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** लातूरच्या बहुचर्चित शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी डॉ.अजय अनिरुद्ध जाधव यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा नुकताच स्नेहीजनांच्या वतीने हृद्य सत्कार करण्यात आला.

शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील यांच्या निधनाने रिक्त झालेल्या संस्थेच्या अध्यक्षपदी डॉ.अजय जाधव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल डॉ. जाधव यांचा डॉ. हंसराज बाहेती, डॉ. कल्याण बरमदे, डॉ. बालाजी गोमसाळे , ईश्वर बाहेती, डॉ. विद्यासागर बाहेती, जयप्रकाश दगडे, राजा कासट , वसंतराव पाटील आदी स्नेहीजनांच्या प्रमुख उपस्थितीत सत्कार करण्यात आला. या सत्कारास उत्तर देताना डॉ. अजय जाधव यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्यावर विश्वास दाखवून संस्थेच्या अध्यक्षपदावर काम करण्याची मोठी जबाबदारी आपल्यावर सोपविल्याबद्दल सर्वांप्रति आभार व्यक्त केले. आपल्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी निश्चितच व्यवस्थितपणे पार पडण्याचा आपण प्रामाणिक प्रयत्न करू. दिवंगत अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून यापुढेही संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आपण प्रयत्नशील राहू. सर्वांना सोबत घेऊन संस्थेच्या नावलौकिकात भर घालण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचेही नूतन अध्यक्ष डॉ. अजय जाधव यांनी सांगितले. या निवडीबद्दल विविध स्तरातून डॉ.अजय जाधव यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# न्यायालयाच्या आदेशाने मिस्टर नगरसेवकाने सोडला घराचा ताबा; पोलिस बंदोबस्तामुळे उचलावे लागले सामान




**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील प्रमोद देशमुख यांनी स्वत:च्या मालकीचा फ्लॅट मिस्टर नगरसेवक अंकित नंदकिशोर बाहेती यांना कराराने भाडेतत्वावर दिलेला होता. मात्र घरभाडे थकविल्याने घर खाली करण्यास सांगूनही बाहेती यांनी घराचा ताबा सोडला नव्हता. या प्रकरणी घरमालक प्रमोद देशमुख यांनी न्यायालयात धाव घेतली होती. याप्रकरणी न्यायालयाने प्रमोद देशमुख यांच्या बाजूने निवाडा करत मिस्टर नगरसेवकाला घराचा ताबा सोडण्याचे निर्देश दिले होते. त्या निर्देशानुसार मिस्टर नगरसेवक अंकित बाहेती यांनी आपला ताबा सोडत पोलिस बंदोबस्तात त्यांनी घरातील सामान हलवावे लागले आहे.

प्रभाग १६ मध्ये असलेल्या एका इमारतीत प्रमोद चंद्रसेन देशमुख यांचा स्वत:च्या मालकीचा फ्लॅट होता. सदर फ्लॅट मिस्टर नगरसेवक अंकित बाहेती यांनी भाडेतत्वावर घेतलेला होता. सुरुवातीला काही महिने वेळेवर घरभाडे दिले. मात्र त्यानंतर घरभाडे देण्यास टाळाटाळ करून घराचा ताबा सोडण्याची कोणतीच तयारी त्यांनी दाखविली नाही. यामुळे मनस्ताप झालेले घरमालक प्रमोद देशमुख यांनी भाडे नियंत्रण कायदा न्यायालय छत्रपती संभाजीनगर विभाग येथे धाव घेतली. याप्रकरणी घरमालक प्रमोद देशमुख यांना न्यायालयाने दिलासा देत सदर घर तात्काळ खाली करण्याचे निर्देश देवून दंडासहीत थकीत भाडे देण्याचे आदेशित केले होते. तसेच सदर घर मिस्टर नगरसेवकाच्या ताब्यात पोलीस बंदोबस्तात खाली करून घ्यावे, असेही निर्देश न्यायालयाने दिले होते.

याप्रकरणी घरमालक प्रमोद देशमुख यांनी पोलीस बंदोबस्त घेवून आपल्या मालकीच्या घराचा ताबा मिळविण्यासाठी कारवाई केली. या कारवाईत मिस्टर नगरसेवक अंकित बाहेती यांनी पोलीस बंदोबस्तामुळे आपल्या घरातील सामान हलवत घराचा ताबा सोडला आहे. याबाबत प्रतिक्रीया देताना घरमालक प्रमोद देशमुख यांनी सांगितले की, अखेर सत्तेचा विजय झालेला असून मला न्याय मिळाला आहे. लोकप्रतिनिधी किंवा त्यांच्या नातेवाईकांनी अशा प्रकारचे वर्तन करणे योग्य नसून या लोकप्रतिनिधींकडून सर्वसामान्यांनी काय अपेक्षा करावी, असा प्रश्नही उपस्थित केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशाने पोलीस बंदोबस्तात झालेल्या या कारवाईमुळे मिस्टर नगरसेवक किंवा नगरसेवक यांच्या विरोधात पक्ष काय कार्यवाही करणार याकडे लक्ष लागलेले आहे.

# थॅलेसेमियाग्रस्त मुलाच्या वाढदिवसानिमित्त जीवदानाचा संकल्प! ५६ रक्तदात्यांनी केले रक्तदान




**लातूर/प्रतिनिधी :** निटूर येथील अमोल शिंदे मित्रपरिवार, ग्रामस्थ आणि सरस्वती कराड ब्लड बँकेच्या संयुक विद्यमाने ध्रुव अमोल शिंदे या थॅलेसेमियाग्रस्त बालकाच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला गावकऱ्यांनी व मित्र परिवाराने उत्स्फूर्त प्रतिसाद एकूण ५६ रक्तदात्यांनी रक्तदान करून जीवदानाचा आदर्श उपक्रम यशस्वी केला आणि ध्रुवचा वाढदिवस अविस्मरणीय केला. निटूर येथे घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात बालकाच्या पालकांनी सर्व रक्तदात्यांचा विविध प्रकारच्या वृक्षरोपांचे वाटप करून सन्मान केला तसेच पर्यावरण संवर्धनाचाही संदेश दिला. थॅलेसेमिया रुग्णांच्या उपचारासाठी येणारा आर्थिक भार व गरज लक्षात घेऊन उपस्थित गावकऱ्यांनी, मित्रपरिवार, नातेवाईक यांच्या मदतीने रक्त संकलन करण्याचा समाजपयोगी उपक्रम यशस्वी पार पाडला. रक्तदान, वृक्षारोपण आणि सामाजिक सहकार्याचा सुंदर संगम घडविणाऱ्या या उपक्रमामुळे थॅलेसेमिया रुग्णांसाठी मदतीचा नवा आदर्श निर्माण झाला असून उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक केले. एम. आय. टी. अंतर्गत श्रीमती सरस्वती कराड रक्तकेंद्र चे डॉ. दाताळ, टेक्निकल सुपरवायझर विकास करंजे, गोविंद गिराम, शिवाजी जवादे, सामाजिक कार्यकर्त्या सुचिता भागवते आदींनी सहकार्य केले. तसेच दत्ता करंजे, वैद्यकीय अधिकारी डॉक्टर मोरे, विठ्ठल बुडगे, बालाजी आंबेगावे, शिवानंद उकळे, पत्रकार रमेश लांबोटे, पत्रकार राजकुमार सोनी, संदीप डांगे, शिवराज सोमवंशी, विरनाथ बुडगे आदींनी रक्तदान शिबिरास सहकार्य केले.

# डॉ. इमरान शेख यांचा १५ जुलै रोजी उत्साहात वाढदिवस साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** डॉ. इमरान मोहम्मद गौस शेख यांचा वाढदिवस १५ जुलै रोजी उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. खडक हनुमान मंदिर समोरमान समोरील सिटी परमा मेडिकल तथा डॉ. इमरान शेख यांची ओपीडी येथे आयोजित कार्यक्रमात केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला.

या प्रसंगी प्लास्टिक मुक्त अभियान राबविण्याचा संकल्प करण्यात आला. तसेच नागरिकांना प्लास्टिक कॅरीबॅगचा वापर टाळण्याचे आवाहन करत कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवस साजरा करण्याच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. कार्यक्रमाला व्ही. एस. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विनोदभाऊ खटके तसेच दैनिक महावृत्तचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, लातूरचे जिल्हा सरचिटणीस अशोक हनवते यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून व्ही. एस. पँथर्स संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिनभाऊ मस्के, पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे, साप्ताहिक समृद्ध व्यापारचे संपादक दत्तात्रेय परळकर, अन्वर शेख यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी डॉ. इमरान शेख यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत त्यांच्या वैद्यकीय व सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमात पर्यावरण संरक्षण, स्वच्छता आणि सामाजिक जबाबदारी या विषयांवरही उपस्थितांनी आपले मनोगत व्यक्त केले.

सामाजिक संदेश देणाऱ्या या आगळ्यावेगळ्या वाढदिवस सोहळ्यामुळे परिसरात समाधान आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.





## संपादकीय...

# पुढील काही महिन्यांत महागाईचा दबाव आणखी वाढू शकतो.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे चार टक्के महागाई दराचे लक्ष्य हा भारताच्या चलनविषयक धोरणाचा मुख्य आधार आहे. किंबहुना देशाच्या अर्थव्यवस्थेला नियंत्रित ठेवणारी ती मूलभूत चौकट आहे. २००९ ते २०१३ या कालावधीत ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई ९ ते १० टक्क्यांच्या पुढे गेली होती. जानेवारी २०१४ मध्ये आरबीआयचे तत्कालीन डेप्युटी गव्हर्नर डॉ. ऊर्जित पटेल यांच्या अध्यक्षतेखालील समितीने भारताने 'फ्लेक्सिबल इन्फ्लेशन टार्गेटिंग' ही पद्धत स्वीकारावी, अशी शिफारस केली. महागाई मोजण्यासाठी ग्राहक किंमत निर्देशांक हा प्रमुख निकष असावा आणि मध्यम कालावधीत महागाई ४ टक्के ठेवण्याचे लक्ष्य निश्र्चित करावे, असे समितीने सुचवले. यानुसार फेब्रुवारी २०१५ मध्ये केंद्र सरकार आणि आरबीआय यांच्यात 'मॉनेटरी पॉलिसी फ्रेमवर्क ग्रीमेंट' झाला. यामध्ये प्रथमच ४ टक्के महागाईचे लक्ष्य अधिकृतपणे स्वीकारले. त्यासाठी २ ते ६ टक्के असा सहिष्णुता पट्टा निश्र्चित केला. यानंतर मे २०१६ मध्ये 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (दुरुस्ती) कायदा, २०१६' लागू झाला. यामुळे महागाई लक्ष्यीकरणाला कायदेशीर आधार मिळाला. केंद्र सरकारने प्रथम २०१६ ते २०२१ या कालावधीसाठी चार टक्के महागाईचे लक्ष्य निश्र्चित केले. २०२१ मध्ये या चौकटीचा आढावा घेतल्यानंतरही सरकारने हीच चौकट पुढे सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला. चार टक्के हे लक्ष्य निवडण्यामागे आर्थिक समतोलाचा विचार होता. अतिशय कमी महागाईमुळे आर्थिक वाढ आणि गुंतवणूक मंदावते, तर जास्त महागाईमुळे नागरिकांची क्रयशक्ती कमी होते आणि अर्थव्यवस्थेत अस्थिरता निर्माण होते. त्यामुळे हा दर किंमत स्थैर्य आणि आर्थिक वाढ यांच्यात समतोल साधणारा मानला गेला. तसेच २ ते ६ टक्के हा लवचिक पट्टा ठेवण्यात आला, जेणेकरून तेलाच्या किमती, नैसर्गिक आपत्ती किंवा इतर बाह्य धक्क्यांमुळे महागाईत तात्पुरते चढ-उतार झाले, तरी आरबीआयला धोरणात्मक लवचिकता मिळू शकेल. १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०३१ या काळासाठीही चार टक्के महागाईचे लक्ष्य कायम ठेवले आहे; मात्र जून २०२६ मध्ये देशातील किरकोळ महागाई दर वाढून ४.३८ टक्क्यांवर पोहोचला आहे. गेल्या १७ महिन्यांत पहिल्यांदाच महागाईने आरबीआयच्या लक्ष्यित अंदाजाची चौकट पार केली. मे महिन्यात हा दर ३.९३ टक्के होता. ताज्या आकडेवारीने देशातील घाऊक महागाई दरानेही गेल्या दोन वर्षांतील सर्वोच्च स्तर ९.९ टक्के गाठल्याचे दिसून आले. यापूर्वी मे २०२६ मध्ये हा दर ९.६८ टक्के होता. घाऊक महागाई आणि किरकोळ महागाई यांच्यात थेट संबंध असतो. खरे पाहता ऑक्टोबर २०२४ मध्ये सहा टक्क्यांवर पोहोचलेला किरकोळ महागाईचा दर घसरत-घसरत ऑक्टोबर २०२५ मध्ये शून्य टक्क्यांवर आला होता; मात्र २०२६ च्या सुरुवातीलाच इराण-अमेरिका संघर्षामुळे आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळी विस्कळीत होऊन चलनवाढीस निमित्त मिळाले. कच्च्या तेल दरातील ऐतिहासिक वाढीने महागाईच्या दरात तेल ओतले. किरकोळ महागाईचा निर्देशांक मोजताना वाहतूक या उपवर्गवारीला सुमारे नऊ टक्के वेटेज दिले जाते. चालू वर्षात बहुतांश काळ शून्य टक्क्यांजवळ असणारा वाहतूक क्षेत्रातील महागाई दर जून महिन्यात थेट ४.६ टक्क्यांवर पोहोचला. मे महिन्यात केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींमध्ये केलेल्या वाढीचा पूर्ण परिणाम जून महिन्यात दिसतो. वाढलेल्या इंधन खर्चामुळे प्रवासी वाहतुकीचे भाडे वाढले. वाढत्या इनपुट खर्चामुळे जून महिन्यापासून वाहननिर्मिती क्षेत्रातील कंपन्यांनी गाड्यांच्या किमती वाढवल्या. म्हणजेच इंधनाची दरवाढ ही 'संसर्गजन्य परिणाम' करणारी असते आणि जूनमधील एकूण किरकोळ महागाई वाढण्यास तीच मुख्य कारक ठरली. जून महिन्यात १४.२ किलोग्रॅमच्या एलपीजी सिलिंडरची सरासरी किंमत ९४७ रुपयांवर पोहोचली, जी मे महिन्यात ९२३ रुपये होती. मार्चपासून विचार केल्यास सिलिंडरच्या किमतींमध्ये ८० रुपयांपेक्षा जास्त वाढ झाली. सरपण आणि शेणाच्या गोवऱ्यांच्या किमतीदेखील वाढल्या. परिणामी, वीज, गॅस आणि इतर इंधने या वर्गवारीतील महागाईचा दर मे महिन्यातील ०.८ टक्क्यांवरून वाढून जूनमध्ये १.९ टक्क्यांवर पोहोचल्याचे सीएमआयईच्या विश्र्लेषणातून स्पष्ट झाले आहे. महागाई आणि विकास यांचे विषम गुणोत्तर असते. वाढती महागाई ही देशाच्या आर्थिक विकासाला मारक ठरते. किमती वेगाने वाढल्यामुळे नागरिकांची क्रयशक्ती कमी होते. कारण, महागाईच्या तुलनेत उत्पन्न वाढत नाही. ते स्थिरच राहते. यामुळे सर्वसामान्यांचे अर्थकारण कोलमडते. महागाई आरबीआयच्या २ ते ६ टक्क्यांच्या सुरक्षित मर्यादेत असते, तोपर्यंत मध्यवर्ती बँक मौद्रिक धोरणात किंवा व्याजदरात मोठे बदल करत नाही; परंतु हा दर ६ टक्क्यांची मर्यादा ओलांडून पुढे गेला, तर आरबीआयला व्याजदर वाढवावे लागतात. त्यातून कर्जे महाग होतात. त्यामुळे उद्योजक नवीन गुंतवणूक टाळतात आणि ग्राहकांची खरेदी मंदावते. यातून मंदी येण्याची शक्यता असते. काही दिवसांपूर्वी कच्च्या तेलाच्या किमती १० टक्क्यांनी कमी झाल्या होत्या; पण आता पुन्हा आखातात घनघोर युद्ध पेटू लागले असून कच्चे तेल उसळी घेऊन वरच्या दिशेला झेपावू लागले आहे. 'अल निनो'च्या प्रभावामुळे यंदा मान्सून कमकुवत राहिल्यास शेती उत्पादनावर परिणाम होऊन पुढील काही महिन्यांत महागाईचा दबाव आणखी वाढू शकतो. शेती उत्पादन घटल्यास अन्नधान्याच्या किमती वाढतील. चलनवाढीचे परिणाम व्यापक आणि सर्वस्पर्शी असतात. उच्च मध्यम वर्गाला, गलेलठ्ठ पगार असणाऱ्यांना, सरकारी कर्मचाऱ्यांना त्याची झळ जाणवत नाही; पण गरीब, निम्नमध्यम वर्ग, मध्यम वर्ग वाढत्या महागाईने मेटाकुटीला येतो. होर्मुझच्या संकटानंतर खाद्यतेलापासून साबण, कडधान्ये, मसाले, सौंदर्य प्रसाधने यांसह सर्व घटकांचे भाव कडाडले. चार जणांच्या कुटुंबासाठीच्या महिन्याच्या खर्चात एक ते दीड हजार रुपयांनी वाढ झाली. हातावरचे पोट असणाऱ्यांचे रोजचे आयुष्य काटकसरीचे असते. त्या वर्गाला ही भाववाढ कर्जचक्रात ढकलते, तर आर्थिक स्थिती चांगली असणाऱ्यांच्या बचतीवर याचा प्रतिकूल परिणाम होतो. जागतिक परिस्थिती आपण बदलू शकत नाही आणि निसर्गाचे देणेही आपल्या हाती नाही. प्राप्त परिस्थितीत तळाशी असणाऱ्या वर्गाला बसणाऱ्या चलनवाढीच्या झळांची तीव्रता कमी करणाऱ्या धोरणात्मक उपाययोजना मध्यवर्ती बँक आणि शासन निश्र्चित करू शकते. त्या शीघ्रगतीने करण्याची गरज प्रकर्षाने निर्माण झाली आहे. अन्यथा, चहूबाजूंनी आलेल्या संकटांनी मध्यमवर्गाचा कणा मोडून पडेल.

# २०० कोटींच्या कथित मनरेगा भ्रष्टाचाराची चौकशी करा; अन्यथा आमरण उपोषण
## २० जुलैपासून चाकूरमध्ये बालाजी पाटील चाकूरकर यांचा शेतकऱ्यांसह एल्गार

**लातूर/प्रतिनिधी :** चाकूर तालुक्यातील मनरेगा योजनेतील कथित भ्रष्टाचार, प्रलंबित देयके, पिक विमा व शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते बालाजी पाटील चाकूरकर हे शेतकऱ्यांसह दि. २० जुलै २०२६ (सोमवार) पासून चाकूर येथील जुने बसस्थानकासमोरील कमानीजवळ आमरण उपोषणास बसणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत बालाजी पाटील चाकूरकर यांनी बोलताना दिली.

चाकूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांबाबत वेळोवेळी शासन व प्रशासनाकडे निवेदने देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळावा आणि संबंधित प्रकरणांची निष्पक्ष चौकशी व्हावी, या मागणीसाठी आमरण उपोषणाचा निर्णय घेण्यात आल्याचे चाकूरकर यांनी यावेळी सांगितले.

चाकूर तालुक्यातील ८४ गावांमध्ये



मनरेगा योजनेअंतर्गत झालेल्या अंदाजे २०० कोटी रुपयांच्या कथित भ्रष्टाचाराची मार्फत सखोल चौकशी करण्यात यावी.

मनरेगाअंतर्गत विहीर, गोठा, घरकुल, शेततळे, पानंद रस्ते आदी पूर्ण झालेल्या कामांची गेल्या वर्षभरापासून थकीत असलेली रक्कम तात्काळ लाभार्थ्यांना अदा करण्यात यावी.

चाकूर, अहमदपूर व शिरूर अनंतपाळसह राज्यातील नगरपंचायत व नगरपालिका क्षेत्रातील शेतकऱ्यांनाही मनरेगा योजनेचा लाभ लागू करण्यात यावा.

चाकूर, अहमदपूर व शिरूर अनंतपाळ तालुक्यातील शेतकऱ्यांचा २०२५-२६ चा पिक विमा तात्काळ मंजूर करून वितरित करण्यात यावा.

विहीर, गोठे, घरकुल आदी कामे पूर्ण करूनही प्रलंबित असलेली सर्व बिले तातडीने अदा करण्यात यावीत.

अशा मागण्या त्यांनी पत्रकार परिषदेत केले आहेत.

या प्रकरणी मुख्यमंत्री, संबंधित मंत्री, जिल्हाधिकारी व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आला असून चौकशीचे आदेश देण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र अद्याप प्रत्यक्ष चौकशी पूर्ण झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

''संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल होईपर्यंत आणि शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत आमरण उपोषणातून माघार घेतली जाणार नाही,'' असा निर्धार बालाजी पाटील चाकूरकर यांनी व्यक्त केला असल्याचे पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले. या पत्रकार परिषदेला अविनाश जाधव, मुरलीधर माने, गोविंद गवळी पंढरी हादवे सुरेश कांबळे तुकाराम कोरके राम कांबळे .... आधी उपस्थित होते.

# सोनम वांगचुक यांची प्रकृती खालावली; कॉकरोच जनता पार्टीकडून १६ जुलैला देशव्यापी उपोषणाची हाक

नवी दिल्ली : नीट पेपरफुटी प्रकरणावरून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत दिल्लीतील जंतरमंतरवर गेल्या २६ दिवसांपासून आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी बेमूदत उपोषणावर बसलेले प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा आज १८ वा दिवस आहे. वांगचुक यांची खालावती प्रकृती आणि विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी 'कॉकरोच जनता पार्टी'ने उद्या, १६ जुलै रोजी देशव्यापी एकदिवसीय लाक्षणिक उपोषणाची हाक दिली आहे.

(पूर्वीचे ट्विटर) वर पोस्ट करत पक्षाने म्हटले आहे, उद्या, १६ जुलै रोजी सोनम वांगचुक आणि देशातील विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ आमच्यासोबत या एकदिवसीय लाक्षणिक उपोषणात सहभागी व्हा.

गेल्या १८ दिवसांपासून अन्नत्याग केल्यामुळे सोनम वांगचुक यांची प्रकृती चिंताजनक आहे. 'कॉकरोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजीत दिपके यांनी त्यांच्या तब्येतीविषयी माहिती दिली. दिपके यांनी सांगितले की:

उपोषणाने वांगचुक यांच्या शरीरातील स्नायू झिजत असून त्यांना तीव्र वेदना होत आहेत. त्यांचे वजन तब्बल ८.५ किलोने कमी झाले असून, रक्तदाब १०९७० पर्यत खाली आला आहे. दिपके यांनी वांगचुक यांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली असता, वांगचुक यांनी अत्यंत शांतपणे उत्तर दिले, मला उपोषण मागे घेण्यास सांगू नका. उलट सरकारला विचारा की ते आंदोलकांशी



चर्चा का करत नाहीयेत?सोनम वांगचुक यांच्या प्रकृतीबाबत संपूर्ण देशातून काळजी व्यक्त केली जात आहे. उद्धव ठाकरे, काँग्रेस नेते राहुल गांधी, जयराम रमेश, समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव, आपचे अरविंद केजरीवाल आणि तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांच्यासह विरोधी पक्षांतील अनेक नेत्यांनी वांगचुक यांना उपोषण मागे घेण्याचे आवाहन केले आहे.

तसेच, सरकारने तातडीने या विषयावर तोडगा काढावा, अशी म ागणीही त्यांनी केली आहे.

राजकीय नेत्यांशिवाय सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गजांनीही चिंता व्यक्त केली आहे. '३ इडियट्स' फेम अभिनेते ओमी वैद्य (ज्यांच्या पात्राची प्रेरणा काही अंशी वांगचुक यांच्यावर आधारित असल्याचे मानले जाते) यांनी एक भावूक व्हिडिओ जारी करत, ''मला फुंसुक वांगडूचा मृत्यू पाहायचा नाही,'' असे म्हणत सरकारला संवादाचे आवाहन केले आहे. अभिनेत्री स्वरा भास्कर आणि ज्येष्ठ अभिनेत्री झीनत अमान यांनीही आंदोलनस्थळी भेट देऊन किंवा सोशल मीडियाद्वारे वांगचुक यांच्या लढ्याला पाठिंबा दर्शवला आहे.

२० जुलैला संसदेवर धडक; १ लाखांहून अधिक जणांची नोंदणी

ऱएएऊ परीक्षेतील गैरव्यवहारामुळे विद्यार्थ्यांचे मानसिक खच्चीकरण झाले असून, नैराश्यातून आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना १ कोटी रुपयांची नुकसानभरपाई मिळावी, अशीही आंदोलकांची प्रमुख मागणी आहे.

दरम्यान, आगामी २० जुलैपासून संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू होत आहे. या पहिल्याच दिवशी 'कॉकरोच जनता पार्टी'ने संसदेवर 'चलो संसद' मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. पक्षाचे प्रवक्ते आशुतोष रांका यांनी दिलेल्या माहितीनुसार, पक्षाच्या 'मिस कॉल' मोहिमेद्वारे आतापर्यंत १ लाख ३० हजारांहून अधिक समर्थकांनी या संसदेवरील मोर्चात सहभागी होण्यासाठी आपली नोंदणी केली आहे.

# मुक्तबंदी, परिविक्षाधीन बंदीच्या सहायक अनुदानात दुप्पट वाढ; निर्दोष बंद्यांनाही पुनर्वसनासाठी आता मिळणार ५० हजार रुपयांचे अनुदान- महिला व बालविकास मंत्री

**मुंबई :** कारावासाची शिक्षा पूर्ण केलेले मुक्तबंदी, परिविक्षाधीन बंदी यांच्या पुनर्वसनासाठी महिला व बाल विकास विभागामार्फत सहायक अनुदान योजना राबविण्यात येते. या बंदीवानांच्या अनुदानात दुप्पट वाढ करून ती रू.२५ हजार अनुदानावरून आता रू.५० हजार इतकी करण्यात आली आहे. तसेच या योजनेत आता, निर्दोष मुक्त झालेल्या परंतु किमान एक वर्ष शिक्षा भोगलेल्या बंदींचाही समावेश करण्यात आला असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

या योजनेचा उद्देश शिक्षा पूर्ण करून किंवा निर्दोष मुक्त होऊन समाजात परतलेल्या व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आर्थिक मदत उपलब्ध करून देणे, त्यांचे पुनर्वसन करणे आणि त्यांना पुन्हा गुन्हेगारीकडे वळण्यापासून परावृत्त करणे हा आहे. तसेच मानवतेच्या दृष्टीकोनातून, किमान एक वर्ष कारावास भोगल्यानंतर निर्दोष मुक्त झालेल्या व्यक्तींनाही या योजनेचा लाभ देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या योजनेअंतर्गत सुरुवातीला रु. १,०००/- इतके आर्थिक सहाय्य दिले जात होते. त्यानंतर टप्प्याटप्प्याने वाढ करून १४ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार ही रक्कम रु. २५,०००/- करण्यात आली. महिला व बाल विकास विभागाने अनुदानाची रक्कम रु. २५,०००/- वरून रु. ५०,०००/- करण्याची शिफारस केली होती. त्यामागील प्रमुख कारणे म्हणजे अनेक वर्षे कारावास भोगल्यानंतर मुक्त होणाऱ्या व्यक्तींचे वय साधारणतः ४० वर्षांपेक्षा अधिक असते. अशा परिस्थितीत स्वतःचा किंवा कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी छोटा व्यवसाय सुरू करण्यासाठी अधिक भांडवलाची आवश्यकता असते. तसेच, पुनर्वसनासाठी शासनाकडून उपलब्ध असलेले हे एकमेव आर्थिक सहाय्य असल्याने त्यात वाढ करण्याबाबत शासन दर तीन वर्षांनी आढावा घेऊन आवश्यकतेनुसार सकारात्मक निर्णय घेईल, अशी माहितीही मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

गेल्या तीन वर्षांत दरवर्षी सरासरी १६२ बंदी निर्दोष मुक्त झाले आहेत. तसेच, योजनेअंतर्गत मागील तीन वर्षात दरवर्षी सरासरी १५५ मुक्तबंदी व परिविक्षाधीन लाभार्थ्यांना सहायक अनुदानाचा लाभ मिळाला आहे. त्यामुळे भविष्यात या योजनेअंतर्गत एकूण सरासरी ३१७ लाभार्थी अपेक्षित आहेत.


योजनेनुसार लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे अर्ज करायचा आहे. त्यानंतर परिविक्षा अधिकाऱ्यांचा गृह चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर पात्र लाभार्थी निश्चित केले जातील. शासनाकडून मंजूर झालेला निधी आयुक्तालयामार्फत संबंधित जिल्हा कार्यालयांना वितरित केला जाईल आणि तेथून लाभार्थ्यांच्या बँक खात्यात ऑनलाईन एकरकमी जमा केला जाईल.

# शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचूक यांच्या उपोषणाकडे सरकारचे दुर्लक्ष चिंताजनक!

ज्या क्षेत्रातून देश तयार होतो आणि युवा पिढीचे भविष्य निर्माण होते व लहानाचा मोठा होतो.अशा क्षेत्रात जर पेपर लिक होत असेल आणि त्याचे उत्तरदायित्व सरकार स्विकारण्यास तयार नसेल तर ही बाब लोकशाहीच्या दृष्टीने योग्य नाही.कारण पेपर फुटी हा विद्यार्थांच्या भविष्यावर मोठा धब्बा असुन, घणाघाती प्रहार आहे.कारण नीट पेपर लिक प्रकरणात २० ते २५ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या ही देशाला आणि शिक्षण क्षेत्राला काळीमा फासणारी घटना आहे एवढी मोठी घटना होऊनही याकडे सरकार दुर्लक्ष करीत आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे.याला वाचा फोडण्यासाठी वांगचूक समोर आले आहे.परंतु सरकार त्यांच्याकडे गांभीर्याने लक्ष देण्यास तयार नाही.देशात एवढे मोठे नीट पेपर लिक प्रकरण झाले. परंतू याची जबाबदारी सरकार तिळमात्र स्विकारण्यास तयार नाही ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. सीजेपीने सुरू केलेल्या आंदोलनाचा २५ वा,तर वांगचुक यांच्या उपोषणाचा १७ वा दिवस १४ जूलैला पूर्ण झाला.अशा परिस्थितीत सरकारने या आंदोलनाकडे दुर्लक्ष न करता, लोकशाहीच्या हिताचा मान ठेवून



सीजेपी सोबत चर्चा करणे आवश्यक आहे. सीजेपीच्या मागण्या काय आहे तो नंतरचा प्रश्न.परंतु जनहितार्थ व विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोणातुन आणि देशाच्या १४५ कोटी जनतेच्या भावनांचा सन्मान व्हावा या दृष्टीने देशापुढे सत्य आणण्यासाठी सरकारची वांगचुक यांच्या उपोषणाच्या बाबतीत चर्चा करणे अत्यंत गरजेचे आहे. सीजेपीच्या प्रमुख मागण्यामध्ये केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा व परीक्षा गैरव्यवहारांमुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना एक कोटी रूपयांची भरपाई द्यावी व अन्य मागण्या सीजेपीच्या आहेत.या मागण्याच्या बाबतीत सरकारने गांभीर्याने विचार करून तातडीने आंदोलकांशी संवाद साधून चर्चा केली पाहिजे.कारण नीट पेपर असो अथवा टीईटी पेपर फुटी असो यामुळे शिक्षण क्षेत्राची मोठ्या प्रमाणात बदनामी व नाचक्की झाली आहे आणि होत आहे. शिक्षणतज्ज्ञ आणि हवामान कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी लढा देण्याची शपथ घेतली आहे आणि त्या अनुषंगाने त्यांनी देशाची राजधानी दिल्लीतील जंतरमंतर येथे उपोषण सुरू केले.परंतु सरकार त्यांच्या उपोषणाबद्दल कोणत्याही प्रकारची दखल घेत नसल्याचे स्पष्ट दिसून येते. परंतु सरकारची मुजोरी आणि शिक्षणाबद्दलची अवहेलना पहाता सोनम वांगचुक यांनी आपले उपोषण तात्पुरते मागे घेऊन व सर्वांना संघटित करून वेगळ्या मार्गाने लढा दिला पाहिजे. कारण ''जाण है तो जहान है''हा मुलमंत्र अंगिकारून पुढील पाऊल उचलावे. कारण आज देशाला सोनम वांगचुक सारख्या शिक्षणतज्ज्ञाची मोठी गरज आहे.त्यामुळे उपोषण मागे घेऊन वेगळ्या पद्धतीने लढा उभा करावा अशी माझी आग्रहाची विनंती आहे. आतापर्यंत जीतकेही पेपर फुटले ते सर्व भ्रष्टाचाराच्या माध्यमातूनच फुटले आहेत.याकरीता सरकार जोपर्यंत भ्रष्टाचार संपविण्यासाठी उत्तरदायित्व निश्चित करत नाही, तोपर्यंत सर्वच बाबतीत मनमानी,अनियंत्रितपणा आणि चुकीच्या निर्णयाचे हे चक्र सुरूच राहील.हा केवळ शिक्षण व्यवस्थेवरच नव्हे तर संपूर्ण भारतीय समाजावर एक कलंक आहे.जेव्हा परीक्षेचे पेपर फुटतात तेव्हा तुम्हाला डॉक्टर आणि इंजिनिअर कसे मिळणार?हेच डॉक्टर जे पेपर फुटीतुन कॉपी करून पास झाले आहेत,ते देशातील जनतेचा



उपचार करतील आणि इंजिनिअर तुमच्या इमारती बांधतील, ज्यामुळे इमारती धाराशाही होऊन जीवितहानी होईल आणि डॉक्टरच्या चुकीच्या निर्णयामुळे जिवीत हाणी सुद्धा होऊ शकते यालाही नाकारता येत नाही. हा सर्व प्रकार पेपर फुटीतुन उत्पन्न होतो. त्यामुळे शिक्षणतज्ज्ञ श्री सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचे महत्व समजून आणि त्यांच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून सरकारने तातडीने पाऊल उचलले पाहिजे. कारण आंदोलकांचे योग्य समाधान व्हावे हीच आमची इच्छा.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# गावातील अवैध दारू विक्री बंद करा; जवळबनच्या महिला आक्रमक, घोषणाबाजी करत नारीशक्तीचा हल्लाबोल !

**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील जवळबन येथे अवैध दारू विक्री मोठ्या प्रमाणात सुरू होती. व्यसनाच्या आहारी गेल्याने अनेक जणांचा मृत्यू यापूर्वी झालेला आहे. अनेकांचे संसार उध्वस्त झाले या सततच्या पुरूषांच्या व्यसनाधीनतेला वैतागून गावातील सबंध महिलांनी एकत्र येऊन बुधवार रोजी सकाळी आठ वाजता आक्रोश रॅली गावात काढली. महिलांच्या पुढाकारानंतर पुरुष मंडळी यामध्ये सहभागी झाले.

गावात दारू विक्री करणाऱ्यांच्या घरावर थेट मोर्चा धडकला. यावेळी महिला आक्रमक होऊन घोषणाबाजी करत होत्या पूर्ण गावातून जनजागृती रॅली काढून जिल्हा परिषद शाळेच्या आवारात आक्रोश मोर्चाचा समारोप करण्यात आला. युसूफ वडगाव पोलीस स्टेशनचे पो कॉ महेश कोकाटे यांना चारशे महीलांच्या सह्याचे निवेदन देण्यात आले. यावेळी व्यसनाधीन झालेल्या कुटुंबातील महिलांनी अक्षरशः हंबरडा फोडून व्यथा मांडल्या एवढ्या अनेक महिलांना अश्रू अनावर झाले होते. सर्व संतप्त झालेल्या महिलांनी यापुढे अवैध दारू विक्री गावात आढळून आल्यास थेट हल्लाबोल करण्याचा इशारा दिला आहे

लहान मुलींनी वेदना मांडल्या गावात दारू विक्री होऊ नये यामुळे आमचे वडील दारू पिऊन आम्हाला मारहाण करतात घरातील सगळ्या वस्तू विकतात आम्हाला खूप त्रास सहन करावा लागतो अशा वेदना लहान मुलींनी व्यक्त केल्या

**तरुणांचा सहभाग**

नारीशक्तीने लढा आक्रमक केल्यानंतर दारूबंदीच्या लढ्यात महिलांच्या मागोमाग तरुणांनी सहभाग नोंदवला तर अनेकांनी आपण यापुढे दारू पिणार नाही असा संकल्प करून गावात कुठेही दारू विक्री होऊ देणार नाही अशी थेट शपथ घेतली.

**सपोनि संदीप मांजरमे यांची अवैध दारू विक्रेत्यांवर थेट कारवाई**

गावात दारूबंदी मोहीम सुरू असताना दुसरीकडे काही अवैध दारू विकणारे विक्री करत होते या वेळेत युसुफ वडगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे यांनी भेट देऊन दारू विक्रीच्या अड्ड्यावर जाऊन गावकऱ्यांच्या साथीने अवैध दारू विक्री करणाऱ्यांना ताब्यात घेतले यामध्ये पांडुरंग बाबुराव वैरागे, समाधान भगवान वैरागे, निलाबाई बंकट शिंदे यांच्यावर दारूबंदी अधिनियम कायद्याद्वारे कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू होती.

**यापुढे कोणीही गावात दारू विकाल तर याद राखा !**

संतापलेल्या महिलांनी यापुढे कोणीही गाव परिसरात दारू विकाल तर याद राखा अशी घोषणाबाजी करत अवैध दारू विक्रेत्यांना इशारा दिला आहे.



**दारूबंदी समितीची स्थापना**

गावातील अवैध दारू विक्री आणि दारू पिणाऱ्यांवर बंदी घालण्यासाठी सरपंच आणि गावकरी मिळून महिलांची दारूबंदी समिती तयार करण्यात आली आहे ही समिति यापुढे क्रियाशील पण एक काम करणार असण्याचे त्यांनी सांगितले. या लढ्यात महिला विद्यार्थी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## केज येथे नव्याने रुजू झालेले पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांचा डॉ.हारुणभाई व डॉ.सीतातीई यांनी केला सत्कार



**केज/प्रतिनिधी :** केज पोलीस ठाणे येथे पोलीस निरीक्षक म्हणून नव्याने रुजू झालेले पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांचा सत्कार केज नगरपंचायत जन विकास फाउंडेशनच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा गटनेते डॉ. हारूणभाई इनामदार व नगराध्याक्षा डॉ. सौ. सीताताई बनसोड आणि नगरसेवक यांनी केला.

पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ हे माजलगाव येथे कार्यरत होते. पोलीस अधिक्षक नवनित कॉवत यांच्या आदेशावरून केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांची नियुक्ती बीड येथे करण्यात आली. व त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर माजलगाव पोलिस ठाणे येथे कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांची नियुक्ती केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक म्हणुन करण्यात आली आहे.

पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांनी नुकताच केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पदाचा पदभार स्वीकारला आहे. त्या अनुषंगाने केज वासीयांच्या व केज नगरपंचात आणि जन विकास फाउंडेशनच्या नव्याने रुजू झालेले पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांचा सत्कार करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

यावेळी जेष्ठ नेते हारुणभाई इनामदार, नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड, रिपाइंचे केज तालुकाध्यक्ष सुनिल हिरवे, गटनेत राजुभाई इनामदार,नगरसेवक जलालभाई इनामदार,सादेकभाई इनामदार, बालासाहेब दांगट, आदर्श क्रांती वार्ताचे संपादक तात्या गवळी, युवा उद्योजक शारुख पटेल, युवा उद्योजक ओम चादर, किरण जोगदंड, रमेश लांडगे यांच्या सह पदाधिकारी,कार्यकर्ते कर्मचारी उपस्थित होते.

## शिंदेंच्या ६ खासदारांची अमित शाहंशी दिल्लीत भेट!

छत्रपती संभाजीनगर : शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश करणाऱ्या सहा खासदारांसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गृहमंत्री अमित शहा यांची मंगळवारी रात्री दहाच्या सुमारास भेट घेतली. या भेटीमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्ये दाखल झालेल्या सहा खासदारांची नव्याने ओळख आणि त्यांच्या मतदारसंघातील प्रश्नावर गृहमंर्त्याबरोबर चर्चा झाल्याचे सूत्रांनी सांगितले.नव्याने नारीशक्ती आणि मतदारसंघ फेररचनेचे विधेयक मांडले जाण्याची चर्चा सुरू असताना तसेच केंद्रीय मंत्रिमंडळातही बदल होण्याची चर्चा सुरू असताना शिंदे आणि अमित शहा यांची ही भेट महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

या भेटी दरम्यान खासदारांनी आपापल्या मतदारसंघातील प्रश्न गृहमंत्री अमित शहा यांच्यासमोर मांडण्यात आले.

केंद्रीय पातळीवर होणाऱ्या राजकीय घडामोडीमध्ये शिवसेनेचे सहा खासदारांसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भेट घेतली. फुटीनंतर या सर्वांची एकत्रित भेट झाली नव्हती. ती मंगळवारी रात्री झाल्याने आता राजकीय घडामोडीबरोबरच या सहा मतदारसंघातील अडकलेल्या प्रकल्पांचा निधप्रश्न मार्गी लागेल, असा दावा केला जात आहे. मराठवाड्यातील काही प्रश्नांवर या बैठकीत चर्चा झाली.केंद्रीय विद्यालयांची गरज, सिंचनाचे प्रश्न, विशेषत: कृष्णा – मराठवाडा सिंचन प्रकल्प केंद्र सरकारकडे वर्ग करुन त्यातून पाच हजार कोटी रुपयांची मागणी खासदार ओम राजेनिंबाळकर यांनी नुकतीच केली होती. ही बाब गृहमंत्री अमित शहा यांच्या कानावर घातल्याचे ते म्हणाले. परभणी, हिंगोली आणि धाराशिवमधील केंद्राच्या योजनांमधील अडथळे आणि सहकार विभागाच्या मागण्या यावर चर्चा झाली आहे. या सहा फुटीर खासदारांमध्ये सर्वात पहिल्यांदा खासदार संजय जाधव यांनी ठाकरे गट सोडणार, असे जाहीर केले होते. तर सर्वात शेवटी ओम राजेनिंबाळकर यांनी या प्रस्तावास होकार दिला होता. यामुळे मंत्रिमंडळ फेरबदलांमध्ये परभणी किंवा धाराशिव येथील खासदार असू शकतात, अशी चर्चा पेरली जात आहे.

शिवसेनेच्या फुटलेल्या सहा खासदारांच्या मतदारसंघात उद्धव ठाकरे यांनी मेळावा घेऊन शिवसैनिकांशी चर्चा केली. या सहा खासदारांविरोधात मतदारसंघात निर्माण झालेले वातावरण लक्षात घेता केंद्रीय पातळीवरुन या मतदारसंघात मोठे प्रकल्प मंजूर होण्याची घोषणाही होईल, असे सांगण्यात येत आहे. मराठवाड्यात लॉजिस्टिक पार्कसह अनेक मागण्या नव्याने करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

## इराणच्या बंदरांवर अमेरिकेची नाकेबंदी, होर्मुझच्या सामुद्रधुनीत जहाजांवर केलेल्या हल्ल्यांनंतर निर्णय

दुबई : स्ट्रेट ऑफ होर्मुझ'मधून (होर्मुझची सामुद्रधुनी) जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या जहाजांवर इराणनं केलेल्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर अमेरिकन लष्करानं बुधवारी पहाटे इराणी बंदरांवर पुन्हा नाकेबंदी लागू केली. युद्ध संपवण्यासाठीचा तात्पुरता करार कोलमडत असतानाच, अमेरिकन लष्कराला आश्रय देणाऱ्या देशांवर यामुळं नवीन हल्ले झाले आहेत. मध्य पूर्वेतील इराणचे काही दिवस चाललेले प्रतिहल्ले आणि शांततेच्या काळात जगातील एक-पंचमांश तेल व नैसर्गिक वायूची वाहतूक ज्या जलमार्गावरून होते, त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी दोन्ही देशांचे सुरू असलेले प्रयत्न, यांमुळे हा प्रदेश पुन्हा एकदा युद्धाच्या उंबरठ्यावर जाण्याचा धोका निर्माण झाला आहे.अमेरिकेनं सर्वात आधी एप्रिलच्या मध्यावर ही नाकेबंदी लागू केली आणि त्यानंतर जूनच्या मध्यावर ती उठवली होती. हा निर्णय इराणचा अणुकार्यक्रम यांसारख्या मुद्द्यांवर वाटाघाटींसाठी ६० दिवसांचा कालावधी निश्चित करणाऱ्या तात्पुरत्या करारावर स्वाक्षरी केल्यानंतरच्या दुसऱ्या दिवशी घेण्यात आला होता. मात्र, या होर्मुझच्या सामुद्रधुनीवरून सुरू असलेल्या संघर्षामुळं चर्चा खोळंबली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी पुन्हा नाकेबंदी लागू करण्याची घोषणा केली, तेव्हा त्यांनी या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांवर २० टक्के शुल्क आकारण्याचेही जाहीर केलं होतं.

# होळ येथील जलजीवन मिशन योजनेमुळे खोदलेले रस्ते महिनाभरात दुरुस्त होणार

### लेखी आश्वासनानंतर पत्रकार उत्तरेश्वर शिंदे यांचे आमरण उपोषण स्थगित




**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील होळ येथे जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या १४ कोटी ७९ लाख रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेतील विविध प्रलंबित कामांबाबत पत्रकार उत्तरेश्वर शिंदे यांनी बुधवारी (दि.१५) आमरण उपोषण सुरू केले होते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी खोदलेले रस्ते निधी उपलब्ध होताच एका महिन्याच्या आत दुरुस्त करण्यात येतील, असे लेखी आश्वासन दिल्यानंतर शिंदे यांनी उपोषण तात्पुरते मागे घेतले.

होळ गावात जलजीवन मिशनअंतर्गत पाईपलाईन टाकण्यासाठी खोदण्यात आलेले रस्ते अद्याप दुरुस्त करण्यात आलेले नाहीत. तसेच नागरिकांना तातडीने नळजोडण्या देणे आणि ग्रामपंचायत कार्यालयाच्या पाठीमागील अपूर्ण पाईपलाईनचे काम पूर्ण करणे, या प्रमुख मागण्यांसाठी पत्रकार उत्तरेश्वर शिंदे यांनी पाण्याच्या फिल्टरसमोर आमरण उपोषण सुरू केले होते. या उपोषणाद्वारे त्यांनी गावातील पाणीपुरवठा आणि रस्त्यांच्या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. उपोषणाला विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना तसेच ग्रामस्थांनी पाठिंबा दर्शविला. दुपारनंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे उपविभागीय अभियंता सुशील सारणीकर यांनी उपोषणस्थळी भेट देऊन शिंदे यांच्याशी चर्चा केली.

यावेळी खोदलेले रस्ते निधी उपलब्ध होताच एका महिन्याच्या आत दुरुस्त करण्यात येतील, असे लेखी आश्वासन देण्यात आले. त्यानंतर पत्रकार उत्तरेश्वर शिंदे यांनी उपोषण तात्पुरते स्थगित केले. यावेळी विभागाचे अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ तसेच विविध पक्ष व संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

### होळंबे कन्स्ट्रक्शनकडून होतेय काम; नळ जोडण्यांचा प्रश्न अद्याप कायम

होळ येथील जलजीवन मिशन योजनेचे काम कंत्राटदार एम.एम. होळंबे कन्स्ट्रक्शन यांच्या माध्यमातून सुरू असून, सुमारे ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. मात्र, घरगुती नळजोडण्या देण्याचा प्रश्न अद्यापही प्रलंबित आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने यासंदर्भात ग्रामपंचायतीला दोन वेळा पत्रव्यवहार केला आहे. या जोडण्या लोकसहभागातून देण्याची तरतूद असली, तरी ग्रामस्थांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचे सांगितले जात आहे. तसेच ग्रामपंचायतीकडूनही आवश्यक पाठपुरावा होताना दिसत नाही. त्यामुळे नळजोडण्या देण्याचा पेच कायम असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## केज पोलिसांची धाडसी कारवाई!; केज पोलीस ठाणे हद्दीत चालता ट्रक लुटणाऱ्या गुन्हेगाराला केले गजाआड



**केज/प्रतिनिधी :** केज पोलीस ठाण्याच्या हद्दीत पहाटेच्या वेळी चालता ट्रक लुटणाऱ्या गुन्हेगाराला केज पोलिसांनी गजाड केले असून सदरील आरोपीची चौकशी केली असता दोन गुन्हे उघडकीस आले आहेत. केज पोलिसांच्या या धाडसी कारवाईमुळे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, दिनांक जुलै२०२६ रोजी फिर्यादी शेख युसुफ शेख इस्माईल वय ५८ वर्षे रा. छत्रपती संभाजी नगर यांनी केज पोलीस ठाणे येथे हजर होऊन सांगितले की, केज-बीड महामार्गावरील उमरी टोल नाक्याच्या जवळपास त्यांचा ट्रक क्रमांक एम एच २० इ एल ७३८६ या ट्रक मधून कोणीतरी अज्ञात इसमाने बियरचे बॉक्स काढून घेतले आहेत.

असे सांगितल्यावरून केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या आदेशावरून डीबी पथकाचे पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण कीर्तने व त्यांची टीम ही शासकीय वाहनाने तात्काळ घटनास्थळी जाऊन भेट दिली असता उमरी टोल नाका ते पिंपळगाव फाटा दरम्यान रोडच्या डाव्या बाजूस वेगवेगळ्या ठिकाणी काचेच्या फुटलेल्या किंगफिशर बियरच्या बाटल्याचे तुकडे व त्यांच्या जवळच रोडच्या कडेला पडलेल्या खपटाचे बॉक्स असे मिळून आले.

त्यानंतर पारधी पिढी कोरेगाव या ठिकाणी डीपी पथकातील कर्मचारी गेले असता त्यांना पाहून काही लोक पडताना दिसले त्यातील एक ही संख्याच्या खांद्यावरील दोन बॉक्स घेऊन पळत असताना पुढे उसात जाऊन लपला असता. डीबी पथकाने त्याचा पाठलाग करून एका इसमास मोठ्या सीताफिने पकडले त्यास त्याचे नाव गाव विचारले असतात त्याने त्याचे नाव महादेव कल्याण पवार वय २४ वर्षे रा.कोरेगाव पारधी वस्ती ता.केज असेच सांगितले. त्यानंतर सदर आरोपी व मुद्देमाल घेऊन शासकीय वाहनाने पोलीस ठाणे केज येथे येऊन आरोपीला विश्वासात घेऊन अजून काही गुन्ह्याबाबत विचारपूस केले असता त्याने पोलीस ठाणे केज येथे गु. र.नं. ४२३/२०२६ कलम३०३(२) भारतीय न्याय संहिता अन्वये दिनांक/७/२०२६ रोजी७-०० वाजता दाखल गुन्ह्यात सावंतवाडी फाट्यावर चालत्या ट्रक मधून ताडपत्री फाडून शेंगदाण्याचे पाच कट्टे चोरल्याचे कबुली दिली आहे त्यावर यायच्या सोबत असणारे साथीदार यांचे नाव व गाव आणि किती जण आहेत याबाबत विचारपूस केली असता उडवा उडवीची उत्तरे देत आहे. सदरील गुन्ह्यात त्याला दिनांक १५ जुलै २०२६ रोजी अटक करण्यात आली असून सदरील घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पी.टी. चव्हाण हे करीत आहेत.


सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ, देवी पथकातील पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण कीर्तने, पोहे बाळासाहेब अहंकारे पोह अनिल नागरगोजे पोलीस अंमलदार नितीन वारे पोलीस अमलदार राहुल तर कसे पोलीस अंमलदार दादाराव देवगुडे यांनी केली आहे.

# शिवलिंग नागापुरे यांना शिक्षणशास्त्र विषयात पीएच.डी.प्रदान

**औसा/प्रतिनिधी :** जिल्हा परिषद कन्या प्रशाला भादा, ता. औसा येथे कार्यरत असलेले, महाराष्ट्र शासन राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त श्री शिवलिंग उमाकांत नागापुरे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड च्या आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेंतर्गत शिक्षणशास्त्र विषयात पीएच.डी.(डॉक्टरेट)पदवी प्राप्त झाली आहे.नागापुरे यांनी स्वामी विवेकानंद अध्यापक महाविद्यालय उदगीरचे प्राचार्य डॉ.गोपाळ पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केलेल्या ''लातूर जिल्ह्यात इंस्पायर अवार्ड्स मानक योजनेमुळे विद्यार्थ्यांत विकसित होणारी संशोधनवृत्ती, सृजनशिलता व सामाजिक उपयोगितेचा अभ्यास'' या संशोधन प्रबंधास मान्यता मिळाली आहे.

नांदेड विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र संकुलात आयोजित मौखिक परीक्षेनंतर श्री शिवलिंग उमाकांत नागापूरे यांना शिक्षणशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील आंतर विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रोफेसर डॉ.चंद्रकांत बाविस्कर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मौखिक परीक्षेसाठी बहिस्थ परीक्षक म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथील शिक्षणशास्त्र व विस्तार विभागाचे प्रा. (डॉ.) वैभव जाधव, शिक्षणशास्त्र शैक्षणिक संकुलाच्या संचालक तथा माजी अधिष्ठाता प्रोफेसर वैजयंता पाटील, संशोधन मार्गदर्शक प्राचार्य डॉ. गोपाळ पवार,पुणे विद्यापीठच्या दूरस्थ शिक्षण विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. राहुल गायकवाड, प्राचार्य डॉ. निलिमा अंबाडकर, प्रा. डॉ.महेश जोशी, प्रा. डॉ. सुनिता पाटील, डॉ. अशोक गिनगिने, प्रा. भीमा केंगले,प्रा. महेंद्र आल्टे,प्रा.महेश स्वामी आणि अनेक संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

नागापुरे यांनी भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयामार्फत राबविल्या जाणाऱ्या इंस्पायर अवार्ड्स मानक योजनेशी संबंधित संशोधन कार्य पूर्ण केले आहे.ह्या योजनेशी यापूर्वी देशात पीएच.डी. स्तरावर फक्त एकच संशोधन झाले असून नागापुरे यांचे या योजनेशी संबंधित देशातील दुसरे तर महाराष्ट्रातील पहिले संशोधन कार्य आहे.इंस्पायर अवार्ड्स मानक योजनेच्या माध्यमातून लातूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांमध्ये विकसित होणाऱ्या संशोधनवृत्ती, सृजनशिलता आणि सामाजिक उपयुक्तता या तीन महत्त्वपूर्ण घटकांचा एकत्रित व सखोल अभ्यास ह्या संशोधनात करण्यात आला आहे.



डॉ.शिवलिंग नागापुरे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल नांदेड विद्यापीठाच्या आंततरविद्या शाखेचे अधिष्ठाता प्रोफेसर डॉ.चंद्रकांत बाविस्कर,शिक्षणशास्त्र संकुलाच्या संचालिका प्रोफेसर वैजयंता पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हुशारसिंग साबळे, पदव्युत्तर विभागाचे उपकुलसचिव श्री रवी मोहरीर, राज्य विज्ञान संस्था नागपूरचे संचालक डॉ.राजकुमार अवसरे, लातूर जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी प्रमोद पवार, माध्यमिक शिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ गणपत मोरे,लातूर विभागीय सहाय्यक शिक्षण उपसंचालक संजय पंचगल्ले, लातूर विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सुधाकर तेलंग, सचिव अनुपमा भंडारी, धाराशिवचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी, लातूर डाएटचे प्राचार्य डॉ.मारुती सलगर, योजना शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे,औसा रेणापूर उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, औसा तहसिलदार घनश्याम अडसूळ, औसा गटविकास अधिकारी अनंतकुमार मिरगने, उपशिक्षणाधिकारी बुऱ्हान हाश्मी, औसा गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते,विस्तार अधिकारी मधुकर ढमाले, प्रसिद्ध विचारवंत नागोराव कुंभार सर, प्राचार्य डॉ. बाबासाहेब गोरे, प्राचार्य प्रशांत धाराशिवे,प्रा.डॉ.ज्योत्स्ना गव्हाणे पवार, प्रा.विवेकानंद ढगे, प्रा.सच्चिदानंद ढगे, प्रा.संभाजी नवघरे, द्वारकादास श्यामकुमार ग्रुपचे तुकाराम पाटील व त्यांचे मित्रमंडळ यांच्यासह विविध प्रशासकीय अधिकारी,विविध शैक्षणिक संस्था, मुख्याध्यापक, शिक्षक,विद्यार्थी, पालक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, विविध शिक्षक संघटनेचे पदाधिकारी आणि मित्रपरिवार यांनी डॉ. शिवलिंग नागापुरे यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# आरोग्य सेवांचा गुणात्मक दर्जा वाढवावा

## एकात्मिक आरोग्य वर्धिनी समिती आढावा बैठकीत आ. रमेशआप्पा कराड यांची सूचना

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर ग्रामीण मतदार संघात ९५% आयुष्यमान आरोग्य कार्डचे वितरण झाल्याबद्दल समाधान व्यक्त करून ग्रामीण भागातील जनतेला केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांच्या दर्जात गुणात्मक आणि परिणामकारक वाढ करावी, सुविधांचे बळकटीकरण व्हावे आणि आरोग्य विषयक उपक्रम लोकाभिमुख करावेत यासाठी अधिकारी, कर्मचारी यांनी कार्यरत राहावे अशी सूचना लातूर ग्रामीण विधानसभेचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी केली आहे.

राज्य शासनाने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या क्षेत्रासाठी आरोग्य विषयक नव्याने गठीत करण्यात आलेल्या एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीची पहिली बैठक समिती अध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांच्या अध्यक्षतेखाली १५ जुलै बुधवार रोजी लातूर येथील शासकीय विश्रामगृहात संपन्न झाली.




या बैठकीस समिती सदस्य जि.प. महिला व बालकल्याण सभापती सौ. शिवकन्याताई गोडभरले, रेणापूर पं.स. सभापती सौ. मोनिका सूर्यवंशी, लातूर पं.स. सभापती श्रीकांत बैले, जि.प. सदस्य महादेव साळुंके, सौ. आशाताई भिसे, सौ. छायाताई चिंचोलकर, सौ. राजश्री देशमुख, सौ. अश्विनी शिंदे, महादेव मस्के, सौ. सोनाली थोरमोटे, सौ. भागीरथी पाटील, सौ. दीप्ती आदमाने, जि.प. सां. बा. उप अभियंता सुभाष कुलकर्णी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक सारडा, रेणापूर ग्रामीण रुग्णालय अधीक्षक सौ. ए. बी. अलगुले, बाभळगाव ग्रामीण रुग्णालय अधीक्षक डॉ. एस. एस. बालकुंदे, मुरुड ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. राजाभाऊ गलांडे, गटविकास अधिकारी श्याम गोडभरले, औसा तालुका आरोग्य अधिकारी डॉ. देवणीकर, समिती सचिव लातूर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आर. एच. पवार, सहसचिव रेणापूर तालुका आरोग्य अधिकारी श्रीधर रेड्डी यांच्यासह संबंधित अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

लातूर ग्रामीण मतदार संघातील प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य उपकेंद्र, इमारतीची अवस्था, आरोग्याच्या सुविधा, प्रयोगशाळा, अधिकारी, कर्मचारी, आरोग्य सेविका, मनुष्यबळ, आयुष्यमान आरोग्य कार्ड, कुटुंब कल्याण योजना, स्वच्छतागृह, पाणीपुरवठा, रिक्त पदे याबाबतचा सविस्तर आढावा समिती अध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांनी घेतला. आरोग्य सेविकांच्या रिक्त जागा भरण्याबाबत त्याचबरोबर जीर्ण झालेल्या आरोग्य केंद्राच्या इमारतीची दुरुस्ती आणि नव्याने इमारत बांधकाम यासाठी राज्याचे आरोग्य मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येईल अशी ग्वाही त्यांनी दिली.

जनतेचे आरोग्य सदृढ राहावे यासाठी आरोग्स सुविधा सक्षम असल्या पाहिजेत त्या साठी लागणाऱ्या भौतिक व सर्वप्रकारच्या सोयी सुविधा कमी पडू दिल्या जाणार नाहीत तेंव्हा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सामाजिक बांधिलकी समजून काम करावे असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, अंगणवाडी, बालवाडी सह शालेय विद्यार्थ्याच्या आरोग्य तपासणी बरोबरच वयोगट १४ ते १५ दरम्यानच्या मुलींना गर्भाशय कॅन्सर प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यासाठी जनजागृती करावी असे बोलून दाखवले.

या बैठकीत समिती सदस्यांनी विविध प्रश्न उपस्थित करून अनेक महत्त्वपूर्ण सूचना केल्या तर रेणापूर, लातूर तालुका आणि भादा सर्कलसह लातूर ग्रामीण विधानसभा कार्यक्षेत्रातील आरोग्य यंत्रणा, सोयीसुविधेची सविस्तर माहिती संबंधित तालुका आरोग्य अधिकारी यांनी दिली. बैठकीचे सुत्रसंचलन आरोग्य सहा. प्रशांत शेटे यांनी केले.

या बैठकीस भाजपाचे विक्रमकाका शिंदे, महेंद्र गोडभरले, पद्माकर चिंचोलकर, शरद दरेकर, पांडुरंग बालवाड, भागवत सोट, अनिल भिसे, राजकिरण साठे, हनुमंत गव्हाणे यांच्यासह अनेक जण होते. प्रारंभी समिती अध्यक्ष आणि सदस्यांचा आरोग्य विभागाच्या वतीने यथोचित सत्कार करून स्वागत करण्यात आले.

## सरस्वती महाविद्यालयात महाकवी कालिदास जयंती उत्साहात साजरी




**लातूर/प्रतिनिधी :** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयातील संस्कृत विभागाच्या वतीने दिनांक १५ जुलै २०२६ रोजी महाकवी कालिदास यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य. डॉ. पांडुरंग गोरे आणि संस्कृत विभाग प्रमुख प्रा.ज्योती मामडगे यांनी महाकवी कालिदास यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

कार्यक्रमाप्रसंगी कालिदास दिन का साजरा केला जातो ? हे प्रा. मामडगे ज्योती यांनी सांगितले त्या म्हणाल्या, - की आषाढ महिन्याचा पहिला दिवस महाकवी कुलगुरू कालिदास यांचा जन्मदिवस म्हणून साजरा करण्यात येतो. महाकवी कालिदास यांचे योगदान संस्कृत साहित्यामध्ये अतिशय मोलाचे आहे.

त्यांनी आपल्या शैलीच्या माध्यमातून तीन नाटके, दोन महाकाव्य आणि दोन खंड काव्य यांची रचना केली. महाकवी कालिदासांना त्यांच्या पत्नीने अस्ति कश्चित् वाग्विशेषः। असा प्रश्न केला असता त्यांनी पत्नीच्या प्रत्येक शब्दापासून सुरू होणारे काव्य लिहिले. अशा या थोर कवीचे संस्कृत साह्यातील योगदान अनन्यसाधारण आहे म्हणून त्यांचा हा जन्मदिवस त्यांच्याच काव्यातील एका श्लोकापासून सुरुवात होणाऱ्या 'आषाढस्य प्रथम दिवसे..।' अर्थात आषाढ महिन्याचा पहिला दिवस म्हणून कालिदास दिन साजरा केला जातो. अशी कालिदासा विषयी माहिती सांगितली.

कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. विनय गायकवाड यांनी संस्कृतचे महत्त्व आणि त्या भाषेचा मानवी जीवनावर होणारा संस्कार अशा दोन्ही बाजू सांगितल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. पांडुरंग गोरे यांनी आपल्या श्लोक गायनातून संस्कृत भाषेविषयी असलेले प्रेम व्यक्त केले. उपस्थितांचे आभार डॉ. मोनालीसा खानोरकर यांनी मानले.

याप्रसंगी प्रा. डॉ. वसंत बंडे, डॉ. सुदाम पवार, प्रा. डॉ. बालाजी शिंदे, प्रा. डॉ. राम खलंग्रे, प्रा. अमोल जाधव, प्रा. तुकाराम येमले, प्रा. श्रीमंत दोरवे, श्री. विठ्ठल चव्हाण, श्री. बळीराम कदम, श्री.कोंडीराम कागले, भागीरथी लाड सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## दयानंद विज्ञानमध्ये महाकवी कालिदास यांच्या जयंतीनिमित्त भित्तिपत्रकाचे विमोचन




**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयातील भाषा विभागाच्या वतीने दि.१५ जुलै २०२६ रोजी महाकवी कालिदास यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी बी.एस्सी.पदवीच्या विद्यार्थ्यांनी महाकवी कालिदास यांच्या जीवनकार्य व साहित्यावर प्रकाशझोत टाकणाऱ्या भित्तिपत्रकाचे विमोचन केले.याप्रसंगी सर्व विद्यार्थ्यांनी महाकवी कालिदासाबद्यल माहिती सांगितली.

तसेच बी.एस्सी.द्वितीय वर्षातील उन्नती बादाडे व निकिता जाधव आणि बी.एस्सी.प्रथम वर्षातील माधव मुंढे,परमेश्वर गोरगे, श्रुती चेवले व स्नेहल अहिरे या विद्यार्थ्यांनी महाकवी कालिदास यांच्या जीवनकार्यावर प्रेरणादायी भित्तिपत्रक तयार केल्याबद्दल प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व जयंतीच्याही सर्वांना शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.मेघा पंडित, हिंदी विभाग प्रमुख डॉ. गजानन बने, मराठी विभागातील डॉ.रामशेट्टी शेटकार तसेच सुनील राक्षे, बालाजी यमपुरे, शंकर भालके यांच्यासह इतर प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## सलवार काढण्याचा प्रयत्न आणि छाती दाबणे म्हणजे अत्याचाराचा प्रयत्न नाही; पटना उच्च न्यायालयाच्या निर्णयावर सरन्यायाधीश सूर्यकांत संतापले

नवी दिल्ली: पटना उच्च न्यायालयाने नुकत्याच एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान महिलीची सलवार काढण्याचा प्रयत्न करणे किंवा तिची छाती दाबणे याला बलात्काराचा प्रयत्न म्हणता येणार नाही, असे निरीक्षण नोंदवले होते. या निर्णयाची देशभरात मोठी चर्चा झाली. मंगळवारी हा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर उपस्थित करण्यात आला. यावेळी खंडपीठाने आश्चर्य व्यक्त करत तीव्र नाराजी नोंदवली. तसेच न्यायाधीशांनी अशा प्रकरणांमध्ये अधिक अभ्यास आणि संशोधन करण्याची गरज असल्याचेही सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले. यापूर्वीही इलाहाबाद उच्च न्यायालयाने अशाच स्वरूपाचा निर्णय दिला होता. त्या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने स्वत:हून (सुओ मोटू) दखल घेतली होती. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाने न्यायाधीशांनी अधिक संवेदनशीलता दाखवावी, विशेषत: महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांबाबत निर्णय देताना अशा प्रकारच्या टिप्पणी टाळल्या पाहिजेत, असे स्पष्ट केले होते. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी नाराजी व्यक्त करूनही अशा प्रकारचा आणखी एक निर्णय समोर आल्याने न्यायालयाने चिंता व्यक्त केली. न्यायालयाने सांगितले की, राष्ट्रीय न्यायिक अकादमी समितीने न्यायिक संवेदनशीलतेसंदर्भात एक अहवाल तयार केला आहे.

## गोव्याहून परतणाऱ्या कुटुंबावर काळाचा घाला; ३ जणांचा जागीच मृत्यू

**रत्नागिरी :** मुंबई-गोवा महामार्गावर पुन्हा एकदा भीषण अपघात झाला असून गोव्याहून मुंबईकडे परतणाऱ्या एका कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा रेस्ट हाऊसजवळ बुधवारी (१५ जुलै) सकाळी झालेल्या या भीषण अपघातात एकाच कुटुंबातील तीन जणांचा जागीच मृत्यू, तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.

माहितीनुसार, मुंबईतील आग्रीपाडा परिसरात राहणारे हे कुटुंब गोव्यातून फिरून क्रेटा कारने मुंबईकडे परतत होते. सकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास लांजा रेस्ट हाऊसजवळ त्यांच्या कारने पुढे जात असलेल्या डंपरला मागून जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की क्रेटा कारचा अक्षरश: चुराडा झाला. अपघातात कारमधील दोन महिला आणि एका चिमुकल्याचा जागीच मृत्यू झाला. तर कारमधील अन्य दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. जखमींना तात्काळ लांजा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

## लातूरमध्ये टाईप-१ मधुमेहग्रस्तांसाठी विशेष कार्यशाळा; ६० मुलांना मोफत सीजीएमएस मशीन, ५०० डॉक्टरांचा सहभाग

**लातूर :** आरएसएसडीआय महाराष्ट्र चॅप्टर व इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए), लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने बार्शी रोडवरील हॉटेल ग्रँड पोर्टिको येथे टाईप-१ मधुमेहग्रस्त व्यक्तींसाठी विशेष कार्यशाळा तसेच मधुमेह व लठ्ठपणा या विषयावरील एकदिवसीय वैद्यकीय परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेत ग्रामीण भागातील ६० गरजू टाईप-१ मधुमेहग्रस्त मुला-मुलींना अत्याधुनिक सीजीएमएस (सतत ग्लुकोज निरीक्षण प्रणाली) मशीन मोफत बसविण्यात आली. या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शरीरातील रक्तातील साखरेची पातळी २४ तास, वारंवार बोटाला टोचणी न लावता मोजता येते. त्यामुळे रुग्णांना आहार आणि इन्सुलिनच्या डोसचे योग्य नियोजन करता येते. कार्यशाळेत उपस्थित तज्ज्ञ डॉक्टरांनी टाईप-१ मधुमेहग्रस्त रुग्ण व त्यांच्या पालकांच्या विविध शंकांचे निरसन करून आधुनिक उपचारपद्धती व जीवनशैलीबाबत मार्गदर्शन केले.

यानंतर मधुमेह व लठ्ठपणा या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या वैद्यकीय परिषदेत लातूर व परिसरातील सुमारे ५०० डॉक्टरांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून लातूरचे खासदार मा. डॉ. शिवाजी काळगे उपस्थित होते. तसेच ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. जी. आर. भराडिया, डॉ. अजय जाधव आणि डॉ. रमेश भराटे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या परिषदेत मुंबईचे सुप्रसिद्ध मधुमेहतज्ज्ञ डॉ. विजय पनीकर, डॉ. विजय नेगलूर, डॉ. संहिता वालावळकर, डॉ. मनोज चावला, डॉ. राजीव कोविल, डॉ. पूर्वी चावला, डॉ. निखिल नाशिककर, डॉ. व्यंकटेश शिवणे, डॉ. स्नेहल तन्ना, पुण्याचे डॉ. सुहास एरंडे, छत्रपती संभाजीनगरच्या डॉ. अर्चना सारडा व डॉ. मयुरा काळे, नाशिकचे डॉ. नारायण देवगावकर, नांदेडचे डॉ. समीर चंद्रात्रे व डॉ. संतोष मालपाणी (अध्यक्ष, महा-आरएसएसडीआय ), सोलापूरचे डॉ. भास्कर पाटील व डॉ. अनिकेत इनामदार, साताऱ्याचे डॉ. जयदीप रेवले, कोल्हापूरचे डॉ. राजेश देशमाने व डॉ. अदिती देशमाने, रत्नागिरीचे डॉ. अनिरुद्ध फडके तसेच लातूरचे डॉ. विजय ढवळे आणि डॉ. रामदास बरूरे यांनी मधुमेह व्यवस्थापन, लठ्ठपणा नियंत्रण आणि आधुनिक उपचारपद्धतींवर सखोल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. चंद्रशेखर अष्टेकर (उपाध्यक्ष, महा-आरएसएसडीआय ), डॉ. चांद पटेल, डॉ. प्रदीप नागुरे, डॉ. निखिल दरक तसेच आयएमए लातूरचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, सचिव डॉ. विश्रांत भारती, डॉ. श्वेता काटकर आणि डॉ. आकांक्षा त्रिपाठी यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. बालाजी पुरी, डॉ. श्याम तोष्णीवाल, डॉ. प्रदीप इंदलकर, डॉ. शीतल पाटील, डॉ. स्नेहल शिवपुजे, डॉ. शीतल सोमाणी, डॉ. अभिजित यादव, डॉ. अमोल शेकडे, डॉ. चेतन सारडा, सदानंद कांबळे, डॉ. किरण डावळे, डॉ. ओमप्रकाश भोसले, डॉ. गजानन चव्हाण, डॉ. शिरीष पाटील आणि डॉ. महेश शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

ग्रामीण भागातील टाईप-१ मधुमेहग्रस्तांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणे, त्यांचे जीवनमान उंचावणे आणि वैद्यकीय क्षेत्रातील नव्या संशोधनाची माहिती डॉक्टरांपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

## माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांनी सय्यद नसीर इस्माईल यांच्या घराला आग लागून झालेल्या नुकसानीची केली पाहणी

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील प्रभाग क्रमांक चार मधील अंजली नगर येथे काल रात्री सय्यद नसीर इस्माईल यांच्या घराला आग लागल्याची माहिती मिळताच राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बुधवार दि. १५ जुलै रोजी सकाळी सहकाऱ्यांसह प्रत्यक्ष त्या ठिकाणी भेट देऊन नुकसानीची पाहणी केली. सदरील नुकसानीचा पंचनामा करून आपद्ग्रस्तांना योग्य ती मदत करण्याच्या सूचना महसूल विभाग व महापालिका प्रशासनाला दिल्या आहेत.यावेळी या प्रभागातील नगरसेवक अहमदखान पठाण, सौ. गोरिबी आसिफ बागवान, सचिन गायकवाड, सौ. कौसर इस्माईल शेख इतर पदाधिकारी व नागरिकांनी सदरील आग विझवण्यासाठी तातडीने पुढाकार घेतला, अग्निशमन दलाला पाचारण केले, त्यामुळे आग आटोक्यात येऊन जीवितहानी किंवा इतर ठिकाणी आग पसरून मालमत्तेचे मोठे नुकसान झाले नाही. आग विझवण्यासाठी सर्वच मंडळींनी केलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत, असे यावेळी माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे.



लातूर शहरातील सर्वच रहिवासी क्षेत्रे आणि वाणिज्य आस्थापनांचे फायर ऑडिट करून घ्यावे, आवश्यक त्या सुविधा उभाराव्यात, अग्निशमन दल सहजासहजी पोहोचावे असे रस्ते आणि इतर सुविधा उभारण्यात याव्यात अशा सूचना प्रशासनाला दिल्या असल्याचे यावेळी पत्रकारांशी बोलताना माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सांगितले आहे.याप्रसंगी महापौर सौ. जयश्री सोनकांबळे, उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे. लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष प्रा. शिवाजी जवळेकर, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, काँग्रेस पक्षाचे महापालिकेतील गटनेते विजयकुमार साबदे, नगरसेवक अहमदखान पठाण, विलास को-ऑपरेटिव्ह बॅंकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, नगरसेवक विकास कांबळे, नगरसेवक सचिन गायकवाड, नगरसेविका कौसर शेख, नगरसेविका गौरीबी बागवान, आसिफ बागवान, इस्माईल शेख, लातूर शहर महानगरपालिकेचे क्षेत्रीय अधिकारी पवन सुरवसे, स्वच्छता निरीक्षक रवी शेंडगे, मंडळ अधिकारी नागनाथ खंदाडे, तलाठी प्रवीण कस्तुरे, भालचंद्र सोनकांबळे, बालाजी झिपरे, पवनकुमार गायकवाड, फारूक शेख, सलीम शेख, हमीद पठाण आदींसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी महानगरपालिका व महसूल विभागाचे संबंधित अधिकारी नागरिक उपस्थित होते.

## बीज भांडवल योजनेचा तृतीयपंथीयांनी लाभ घ्यावा- जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड

**लातूर/प्रतिनिधी :** तृतीयपंथीयांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत बीज भांडवल योजना सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत स्वयंरोजगारासाठी तृतीयपंथीयांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तृतीयपंथीयांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देणे, कौशल्य विकास व उद्योजकता प्रशिक्षणाद्वारे शाश्वत रोजगार निर्माण करणे तसेच त्यांचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकास साधणे हा या योजनेचा मुख्य उद्देश असून, लघुउद्योग व सूक्ष्म व्यवसाय सुरू करण्यासाठी हे बीज भांडवल दिले जाणार आहे. लातूर जिल्ह्यातील तृतीयपंथीयांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले.




तृतीयपंथीयांना स्वयंरोजगार व व्यवसायासाठी बीज भांडवल योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होते. समाज कल्याण सहायक आयुक्त यादव गायकवाड, जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्ज्वला पाटील, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राहुल आठवले यांच्यासह तृतीयपंथीयांच्या संघटनांचे प्रतिनिधी, संबंधित विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

बीज भांडवल योजनेअंतर्गत भाजी स्टॉल, वडा-पाव किंवा ज्यूस सेंटर, चहा व स्नॅक्स सेंटर, बेकरी, झेरॉक्स व लॅमिनेशन सेंटर, बांगडी दुकान, पिठाची गिरणी, ब्युटी पार्लर, सलून, जनरल स्टोअर्स, स्टेशनरी, मोबाईल शॉपी, मिनी मालवाहतूक टेम्पो, मसाला निर्मिती, लॉन्ड्री तसेच प्लंबर, इलेक्ट्रिशियन आणि विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या दुरुस्ती व्यवसायांसह अनेक स्वयंरोजगार उपक्रमांसाठी कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे. यामध्ये २५ हजार रुपये लघु कर्ज, ५० हजार रुपये मध्यम कर्ज आणि २ लाख रुपये दीर्घ कर्ज अशा तीन प्रकारांत कर्ज दिले जाते. या कर्ज रक्कमेमध्ये लाभार्थ्याचा ५ टक्के, शासनाचा ४५ टक्के आणि राष्ट्रीयकृत बँकेचा ५० टक्के आर्थिक सहभाग आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना व्याजावर ३ टक्के सवलतही दिली जाणार आहे. तसेच, या योजनेसाठी कोणत्याही जामीनदार किंवा तारणाची आवश्यकता भासणार नाही, असे जिल्हाधिकारी म्हणाले.

इच्छुक अर्जदारांनी अर्जासोबत अधिवास प्रमाणपत्र, तृतीयपंथीय ओळखपत्र, आधार कार्ड किंवा अन्य ओळखपत्र, व्यवसायाच्या जागेचा पुरावा, यंत्रसामग्रीचे कोटेशन, आवश्यकतेनुसार भाडेकरार, ना-हरकत प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र आणि दोन पासपोर्ट आकाराचे फोटो जोडणे आवश्यक आहे. तृतीयपंथीयांनी स्वावलंबी होण्यासाठी या योजनेचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालय येथे संपर्क साधावा, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले.

तृतीयपंथीयांसाठी आधार नोंदणी, विविध दाखले वाटप आदी बाबींचाही यावेळी आढावा घेण्यात आला.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.